# उत्तर भारतातील वन्यजीव स्थळं

अतुल धामनकर

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**उत्तर भारतातील वन्यजीव स्थळं**
अतुल धामनकर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
अतुल धामनकर
पटेल हायस्कूलसमोर,
शिवाजी चौक, चंद्रपूर - ४४२४०२
मो. न. : ७६२०७९२२०६, ९४२३६१९९३३
E mail : atultiger@rediffmail.com.

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २००/-

# लेखकाचे मनोगत

भारत हा नैसर्गिक साधनसंपत्तीने अतिशय संपन्न असलेला देश आहे. इथे कोणत्याही भागात गेलं तरी तुम्हाला संस्कृतीच्या विविधतेसोबत जैवविविधतेचाही आनंद घेता येतो. अगदी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातच्या पश्चिमी टोकापासून अरुणाचल प्रदेशच्या पूर्व टोकापर्यंत भारतातील वन व वन्यजीवांमध्ये कमालीचं वैविध्य आहे. या वन्य जीवनाबद्दल अभ्यासपूर्ण लेखन मागील काही वर्षांत बरंच झालंय. त्यांच्यासोबतच आज विविध दूरदर्शन वाहिन्यांवरूनदेखील वन्यजीवांच्या अंतरंगात डोकावणारे अभ्यासपूर्ण अनेक कार्यक्रम अव्याहतपणे सुरू असतात. साहजिकच आज सामान्य लोकांमध्येदेखील वन व वन्यजीवांविषयी फार उत्सुकता जागृत झाली आहे. त्याच उत्सुकतेतून ते भारतातील अनेक व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्यानं आणि वन्यजीव अभयारण्यांना भेटी देऊन तिथे नैसर्गिक अवस्थेतील वन्य जीवन न्याहाण्याचे आणि त्याला कॅमेराबद्ध करण्याचे ठरवतात.

पण असं असलं तरी वन्यजीव निरीक्षणाला सहज कुठल्याही पर्यटनासाठी बाहेर पडावं, तसं जाऊन चालत नाही. वन्यजीव क्षेत्रे नेहमीच दूरवर वसलेली असतात. बहुधा त्यांच्या आसपास मोठी शहरं-गावंही नसतात. त्यामुळे इथे जाण्यासाठी बरीच पूर्वतयारी करणं आवश्यकच ठरतं.

अशा जंगल भेटीसाठी बाहेर पडण्यापूर्वीच त्याची नीट माहिती करून आखणी करणं अतिशय गरजेचं असतं. त्यामुळे सगळ्यात आधी त्या अरण्याची इत्थंभूत माहिती मिळवणं, कुठून कसं जायचं हे ठरवणं, विमान, रेल्वे, बस, खासगी टॅक्सीची तिकिटं किंवा अग्रीम आरक्षण करणं, प्रवेशपत्र प्राप्त करणं, हॉटेल किंवा वनविश्रामगृहाचं आरक्षण करणं, त्या जागी कोणकोणते वन्य प्राणी-पक्षी आढळतात त्याची आधीच माहिती करून त्यांच्या निरीक्षण किंवा प्रकाशचित्रणासाठी काय-काय करावं लागेल, कोणती फोटोग्राफी उपकरणं सोबत घ्यावी लागणार याची आखणी करणं, हे मोठंच काम असतं. अशा वेळी अगदी छोट्याशा माहितीअभावी देखील तुमची भटकंती गोत्यात येऊ शकते. कित्येक वेळा एखाद्या बाबीची माहिती नसल्याने प्रत्यक्ष त्या अरण्यात गेल्यावर जंगलफेरी न मिळणे, हॉटेल न मिळणे, वाहतुकीच्या साधनांची कमतरता यासारख्या बाबी तुमचा भ्रमंतीचा आनंदच हिरावून घेऊ शकतात.

आज बऱ्याच वन्यजीव क्षेत्रांत अनेक टूर ऑपरेटर्स भ्रमंती आयोजित करून देतात; पण इथे जाताना या टूर ऑपरेटर्सना फक्त हॉटेल-टॅक्सी बुकिंगशिवाय इतर कुठल्या बाबतींची माहिती आहे की नाही, हे आपल्याला माहीत नसतं. खासकरून वन्यजीव, त्यांचा आढळ, त्यांची स्थळं, वन्यजीव निरीक्षण व फोटोग्राफीच्या संधी या बाबी अशा टूर ऑपरेटर्सना माहिती आहेत काय, हे आधीच तपासून घ्यावं. कारण एखाद्या ऐतिहासिक किंवा धार्मिक स्थळाला भेट देण्यासारखं वन्यजीव पर्यटन नक्कीच नसतं. त्यात शेवटी तुम्हाला प्रवास, राहणं-खाणं या बाबींसोबतच उत्तम वन्यजीव निरीक्षणाच्या संधी मिळणंही तेवढंच महत्त्वाचं असतं. असं न झाल्यास तुमच्या अरण्यभेटीचा आनंदच कमी होऊन हिरमोड होऊ शकतो.

निसर्गात जाताना मनात उत्साह असला तरी काही अवास्तव कल्पना घेऊन मुळीच जाऊ नये. उदा. मी ताडोबाला जातोय ते वाघच बघायला चाललोय, असे बरेच जण सांगतात; पण असं करताना त्यांना वाघ हा जंगलातील अत्यंत लपून-छपून वावरणारा, धूर्त शिकारी प्राणी आहे, या गोष्टीचं भान नसतं. निसर्गाने त्याला जंगलातील कुठल्याही अधिवासात बेमालूमपणे मिसळून जाण्याची अद्वितीय अशी देणगी दिली आहे. त्यामुळेच तो अतिशय चौकस, तीक्ष्ण नाक, कान, डोळे असणाऱ्या चितळ, सांबर, रानगवे यांची शिकार करू शकतो. साहजिकच तो या जनावरांच्या तुलनेत कितीतरी कमी इंद्रियसंवेदना असलेल्या माणसापासून सहजपणे लपू शकतो. त्यामुळे वाघ बघण्याचा प्रयत्न करणं हा वन्यजीव पर्यटनातला एक भाग झाला; पण वाघच दिसला पाहिजे हा अट्टाहास चुकीचाच ठरतो. त्याशिवायदेखील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात आणखी ४४ प्रजातींचे सस्तन प्राणी आणि २८० पेक्षा जास्त प्रकारचे रंगीबेरंगी पक्षीपण आहेत, हे लक्षात ठेवावं. म्हणजे तुम्ही जंगलात फिरताना तुम्हाला लगेचच वाघ दिसेल असं होणार नाही; पण बरेच पक्षी, प्राणी हे नक्कीच दिसतील. त्यामुळे त्यांच्याकडे डोळसपणे बघणं, त्यांचं निरीक्षण करणं हा आनंद तुम्ही भरपूर प्रमाणात घेऊ शकता. पुढे जेव्हा तुम्हाला कधीही वाघ दिसेल तेव्हा तो आनंद द्विगुणित होईल, याची खात्री बाळगा.

आजकाल निसर्ग पर्यटनाला निघताना अनेकजण कुटुंबासह मित्रफोटोग्राफर्सचा ग्रुप किंवा लहान-मोठ्या गटाने जातात. त्यावेळी प्रत्येकाचा निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा असतो; पण निसर्ग, वन्य जीवन हे आपल्या ताब्यात नाही, तसेच त्यांना कुठल्याही वेळेचे बंधनसुद्धा नसते, हे नीट ध्यानात ठेवावं. त्यामुळे एखाद्या स्थळाला भेट देण्यासारखं न जाता या पर्यटनासाठी जास्तीचा वेळ ठेवावा. बरेचजण अशा जागी जातानादेखील धावती भेट देतात. जेव्हा कुणी मला गर्वाने सांगतात, की हो आम्हीसुद्धा भरतपूरला जाऊन आलोय आणि तिथे चांगलं दीड तास होतो, तेव्हा या वाक्यावर हसावं की रडावं, हेच कळत नाही.

जयपूरहून आग्र्याला जाताना हे भोज्याला शिवल्यासारखं वाटेतल्या भरतपूरला फक्त हात लावून येतात. खरं तर युनेस्कोची 'वर्ल्ड हॅरिटेज साईट' असलेलं भरतपूर जगातलं एक उत्कृष्ट पक्षी अभयारण्य आहे. इथे कमीत कमी ३-४ दिवस घालवले नाही, तर तुम्ही त्याचं नीट निरीक्षणसुद्धा करू शकणार नाही. त्यामुळेच कुठेही निसर्ग पर्यटनाला जाताना चार दिवसांत तीन अभयारण्ये किंवा सहा दिवसांत चार-पाच जंगलांना भेटी देण्याचे प्रोग्राम मुळीच आखू नयेत. त्यामुळे तुम्हाला कोणत्याही जंगल व त्यातील वन्यजीवांचे नीट अवलोकन करायची संधी मिळणार नाही. साहजिकच तुमचे वन्यजीव निरीक्षणाबद्दलचे मत कलुषित होण्याची शक्यता असते. आम्ही चांगले एक दिवस ताडोबात होतो आणि तरीही आम्हाला वाघ दिसला नाही, असे म्हणणाऱ्यांना मी नेहमी सांगतो की, इथे तुम्ही तीन-चार दिवस राहून कमीत कमी चार ते सहा जंगल सफारी केल्या तरच तुम्हाला नीट वन्यजीव निरीक्षण करायची संधी मिळू शकेल.

कुठलाही वन्य प्राणी खात्रीशीर दिसणं ही बाब गृहीत धरणं हेच चुकीचं आहे. 'वन्य' या शब्दातच ते ध्वनित होतं. वन्य जीवन हे ठरवून बघता येत नाही, यातच त्याची गोडी आणि आनंद टिकून असतो. त्यामुळे पुढे काय घडणार, काय दिसणार, ही हुरहूर तुम्हाला परत-परत त्याच जंगलाकडे आकृष्ट करते. त्यामुळे बरेच निसर्गप्रेमी सतत, एकाच जंगलाच्या वर्षानुवर्षे वाऱ्या करूनदेखील कंटाळत नाहीत.

मी या पुस्तकात जंगल व वन्य जीव पर्यटनासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक गोष्टीचा अंतर्भाव करायचा प्रयत्न केला आहे. मी मागील २३ वर्षे भारतातील विविध अरण्यांतून वन्यजीवांचं निरीक्षण, अभ्यास आणि प्रकाशचित्रणासाठी भटकंती करतोय. त्यातूनच आलेल्या अनुभवांवर हे पुस्तक आधारित आहे. त्यामुळे याचा निसर्गप्रेमी भटक्यांना भरपूर उपयोग होईल, अशी अपेक्षा आहे. त्याशिवाय कुणाला आणखी काही माहिती हवी असल्यास त्यांनी खालील मोबाईल नंबर किंवा ई-मेलवर माझ्याशी संपर्क साधावा.

भारतातील पश्चिम, पूर्व, दक्षिण, उत्तर आणि मध्य या पाच भागांवरील मालिकेतील 'उत्तर भारतातील वन्यजीव स्थळं,' हे पुस्तक तुमच्या हातात देताना खूप आनंद होतोय. यासाठी मी माझे प्रकाशक व इतर प्रत्येकाचा ज्यांचा हातभार या पुस्तकाच्या निर्मितीसाठी लागलाय त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

धन्यवाद!

आपला,
अतुल धामनकर

✦✦✦








# अनुक्रमणिका



१. वाल्मिकी व्याघ्र प्रकल्प ........................................ ११
२. पिलीभित व्याघ्र प्रकल्प ........................................ १३
३. दुधवा व्याघ्र प्रकल्प ........................................ १५
४. कार्बेट व्याघ्र प्रकल्प ........................................ १७
५. सुहेल्वा व्याघ्र प्रकल्प ........................................ १९
६. पालामाऊ व्याघ्र प्रकल्प ........................................ २१
७. दाचिगाम राष्ट्रीय उद्यान ........................................ २३
८. गंगोत्री राष्ट्रीय उद्यान ........................................ २५
९. ग्रेट हिमालयीन राष्ट्रीय उद्यान ........................................ २७
१०. हेमिस राष्ट्रीय उद्यान ........................................ २९
११. हरीक वेटलँड पक्षी अभयारण्य ........................................ ३१
१२. हजारीबाग राष्ट्रीय उद्यान ........................................ ३३
१३. कालेसर राष्ट्रीय उद्यान ........................................ ३५
१४. किश्तवाड राष्ट्रीय उद्यान ........................................ ३७
१५. नंदादेवी राष्ट्रीय उद्यान ........................................ ३९
१६. पिन व्हॅली राष्ट्रीय उद्यान ........................................ ४१
१७. राजाजी राष्ट्रीय उद्यान ........................................ ४३
१८. सुलतानपूर राष्ट्रीय उद्यान ........................................ ४५
१९. व्हॅली ऑफ फ्लॉवर राष्ट्रीय उद्यान ........................................ ४९
२०. बेतला राष्ट्रीय उद्यान ........................................ ५१
२१. कैमूर वन्यजीव अभयारण्य ........................................ ५३
२२. भीमबंध वन्यजीव अभयारण्य ........................................ ५५
२३. गौतम बुद्ध वन्यजीव अभयारण्य ........................................ ५७
२४. लावालोंग वन्यजीव अभयारण्य ........................................ ५९

२५. काबर वन्यजीव अभयारण्य .................................... ६१
२६. पारसनाथ वन्यजीव अभयारण्य ................................. ६३
२७. राजगीर वन्यजीव अभयारण्य .................................... ६५
२८. चंद्रप्रभा वन्यजीव अभयारण्य .................................. ६७
२९. सुखना वन्यजीव अभयारण्य ..................................... ६९
३०. बीर शिकरगड वन्यजीव अभयारण्य ............................. ७१
३१. रूपी भाबा वन्यजीव अभयारण्य ................................ ७३
३२. सेच्हू तुआन नाला वन्यजीव अभयारण्य ........................ ७५
३३. टुंडाह वन्यजीव अभयारण्य ..................................... ७७
३४. कुगटी वन्यजीव अभयारण्य ...................................... ७९
३५. गोविंद सागर वन्यजीव अभयारण्य .............................. ८१
३६. पोंग डॅम पक्षी अभयारण्य ....................................... ८३
३७. छैल वन्यजीव अभयारण्य ........................................ ८५
३८. शिकारीदेवी वन्यजीव अभयारण्य ............................... ८७
३९. तीर्थन वन्यजीव अभयारण्य ..................................... ८९
४०. कंवर वन्यजीव अभयारण्य ...................................... ९१
४१. चूरधर वन्यजीव अभयारण्य ..................................... ९३
४२. रक्षम चिटकूल वन्यजीव अभयारण्य ............................ ९५
४३. नैनादेवी वन्यजीव अभयारण्य .................................... ९७
४४. तालरा वन्यजीव अभयारण्य .................................... ९९
४५. मजाथल वन्यजीव अभयारण्य .................................... १०१
४६. मनाली वन्यजीव अभयारण्य .................................... १०३
४७. लिप्पा असरांग वन्यजीव अभयारण्य ............................ १०५
४८. खोखान वन्यजीव अभयारण्य .................................... १०७
४९. धरणघाटी वन्यजीव अभयारण्य ................................. १०९
५०. सिंबलबारा वन्यजीव अभयारण्य ................................ १११
५१. कैस वन्यजीव अभयारण्य ....................................... ११३
५२. रेणुका वन्यजीव अभयारण्य ..................................... ११७
५३. शिल्ली वन्यजीव अभयारण्य ..................................... ११९

५४. ओवेरा-अरू वन्यजीव अभयारण्य .............................. १२१
५५. कांजी वन्यजीव अभयारण्य ..................................... १२३
५६. गुलमर्ग वन्यजीव अभयारण्य .................................... १२५
५७. सुरिंसर-मनसर वन्यजीव अभयारण्य ............................ १२७
५८. नंदिनी वन्यजीव अभयारण्य ..................................... १२९
५९. रामनगर वन्यजीव अभयारण्य .................................... १३१
६०. हजारीबाग वन्यजीव अभयारण्य ................................. १३३
६१. अबोहर वन्यजीव अभयारण्य .................................... १३५
६२. बीर भुनेरहेरी वन्यजीव अभयारण्य .............................. १३७
६३. अस्सन बॅरेज पक्षी अभयारण्य ................................... १३९
६४. कैमूर वन्यजीव अभयारण्य....................................... १४१
६५. कतारनियाघाट वन्यजीव अभयारण्य ............................ १४३
६६. किशनपूर वन्यजीव अभयारण्य.................................... १४५
६७. हस्तिनापूर वन्यजीव अभयारण्य ................................. १४७
६८. नवाबगंज पक्षी अभयारण्य ...................................... १४९
६९. समासपूर पक्षी अभयारण्य ....................................... १५१
७०. अस्कोट वन्यजीव अभयारण्य ................................... १५३
७१. नॅशनल चंबल वन्यजीव अभयारण्य ............................. १५५
७२. बिनसर वन्यजीव अभयारण्य .................................... १५७
७३. गोविंद पशू विहार वन्यजीव अभयारण्य ......................... १५९
७४. जंगलात जाताना................................................ १६१

✦✦✦





# वाल्मिकी व्याघ्र प्रकल्प

## तराईच्या जंगलातील व्याघ्रदर्शन

**राज्य :** बिहार
**जिल्हा :** चंपारण
**कुठे आहे :** पश्चिमी चंपारणच्या तराई अरण्यात
**अंतर :** पटनापासून २६० कि.मी.

**अरण्याबद्दल थोडंसं :** अतिशय निसर्गसंपन्न जंगल व देखाव्याने संजलेलं 'वाल्मिकी व्याघ्र प्रकल्प' हा उत्तर-पश्चिमी भागातील बिहार राज्यात स्थित आहे. या जंगलाला हिमालयाच्या पायथ्याशी असलेला तराई अरण्याचा भाग जोडलेला आहे. चंपारण म्हणजेच चंपा वृक्षांच्या अरण्याने व्याप्त असलेल्या या जिल्ह्यात वन्यजीवांची निसर्गाने मनसोक्त उधळण केलेली आहे. सुमारे ८८० चौ.कि.मी. एवढ्या क्षेत्रफळाचा हा व्याघ्र प्रकल्प इतरही अनेक जीवांचे नैसर्गिक घर आहे. तो नेपाळमधील चितवन राष्ट्रीय उद्यानाला जोडून भारताच्या सीमेवरच आहे. हिमालयाच्या शिवालिक पर्वतरांगांमधील हे जंगल दोन्ही देशांत जवळपास ३५४९ चौ.कि.मी. एवढ्या भूभागात पसरलेले आहे. पर्वत, डोंगर, दऱ्या, नद्या-नाले, घाटी, झरे, गवती मैदाने यांनी संपन्न असलेले हे अरण्य कोणत्याही निसर्गप्रेमीचे स्वप्न ठरू शकते.

**कशी कराल भ्रमंती :** इथे अनेक प्रकारचे हिंस्र प्राणी आढळत असल्याने पायी हिंडणं धोकादायक आहे. त्यामुळे या अरण्यात जीपने ठराविक वाटांनी फिरून वन्यजीवांचे मनसोक्त दर्शन घेता येईल.

**कशासाठी जाल :** वाघ, हत्ती, गोरल, राजनाग, मगर याशिवाय अनेक प्रकारची रंगीबेरंगी हिमालयीन पाखरं.

**जाण्याचा उत्तम काळ :** इथे जाण्याचा उत्तम काळ नोव्हेंबर ते एप्रिल आहे.

**वनस्पती :** साल, साग, धावडा, जांभूळ, वड, पिंपळ, आंबा, भोकर, बांबू व विविध प्रकारचे गवत व वनौषधी. इथे काही ठिकाणी कढिपत्त्याची दाट झुडपंदेखील उगवलेली आहेत.

**वन्य प्राणी :** इथला प्रमुख भक्षक आहे वाघ. त्याशिवाय इथे हत्ती, बिबळा, झिपरे अस्वल, काकर, चितळ, सांबर, हनुमान वानर, रानडुक्कर, पाणमांजर, नीलगाय, मुंगूस, पिवळ्या गळ्याचा मार्टिन, गोरल, लालतोंडी माकडं, झाडचिचू, उदमांजरं आढळतात.

**पक्षीजीवन :** इथे सुमारे ४०० पेक्षा जास्त पक्ष्यांच्या प्रजातींचा आढळ आहे. त्यात मोठा राखी सुतार, मोठा व राखी धनेश, नीलमुखी तांबट, हिमालयीन आणि फुलवस-ब्रेस्ट्रेड सुतार, कलीज फेजंट, लाल रानकोंबडा, स्वर्ग नांचण, नीलमणी, निलांग, नदी टिटवी, काळ्या मानेचा व रंगीत करकोचा, काष्ठ तुतवार, पलासचा गरुड, डोंगरी व्याध यांचा समावेश आहे.

**सरपटणारे जीव :** मगर, मण्यार, राजनाग, नाग, फुरसे, विरोळा, रानसरडा, घोरपड, सापसुरळी, पाणकासव, तस्कर, घोणस, धामण.

**कुठे-काय बघाल :** या जंगलात हत्तींचे कळप पाहायला एक वेगळीच मौज येते. पक्ष्यांच्या असंख्य जातीही वेड लावणाऱ्या आहेत.

**आसपासची बघण्यायोग्य स्थळं :**

रॉयल चितवन राष्ट्रीय उद्यान, नेपाळ

**कसे जाल :**

**जवळचे विमानतळ :** पटना (२६० कि.मी.) हे जवळचे विमानतळ आहे.

**जवळचे रेल्वे स्टेशन :** वाल्मिकीनगर रोड (१० कि.मी.)

**जवळचे बस स्थानक :** वाल्मिकीनगर (१० कि .मी.)

**कुठे राहाल :** हॉटेल वाल्मिकी विहार,

वाल्मिकीनगर, पश्चिम चंपारण-तसेच अनेक हॉटेल्स व रेस्ट हाऊस गांधीनगर आणि राष्ट्रीय महामार्ग क्र. ६४ वर उपलब्ध आहेत.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**


क्षेत्र संचालक

वाल्मिकी व्याघ्र प्रकल्प,

चंपारण वन विभाग,

पोस्ट-बेतिया, जि. पश्चिम चंपारण

✦




**राज्य :** उत्तर प्रदेश

**जिल्हा :** लखीमपूर, पिलीभित व बहराईच

**कुठे आहे :** भारत-नेपाळ सीमेवर तराई भागात स्थित.

**अंतर :** लखनौपासून २५० कि.मी. वर

**अरण्याबद्दल थोडंसं :** बहराईच, लखीमपूर आणि पिलीभित या उत्तर प्रदेशातील तीन जिल्ह्यांत स्थित असलेला पिलीभित व्याघ्र प्रकल्प हा भारताचा ४१ वा प्रकल्प आहे. हिमालयाच्या पायथ्याशी, तराई प्रदेशात स्थित असलेल्या या अरण्यातील जैवविविधता कोणत्याही निसर्गप्रेमी व्यक्तीला भुरळ घालून मोहात पाडेल अशीच आहे. हा व्याघ्र प्रकल्प एकूण १०८९ चौ.कि.मी. क्षेत्रफळाचा असून याची घोषणा २००८ साली करण्यात आली होती.

या अरण्यात वाघासारख्या निसर्गातील सर्वोच्च शिकाऱ्यासोबतच अनेक नामशेष होण्याकडे वाटचाल करणारे दुर्मीळ वन्य प्राणी आणि पक्षीसुद्धा आढळतात. त्यामुळे भारताच्या अगदी सीमेवर स्थित असलेल्या या व्याघ्र प्रकल्पाला जैव संरक्षणाच्या बाबतीत अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

**कशी कराल भ्रमंती :** इथे जंगलात वनविभागाने ठरवून दिलेल्या वेळांमध्ये सकाळी आणि संध्याकाळी जीपने फिरून वन्य जीवनाचे अवलोकन करता येते.

**कशासाठी जाल :** वाघासोबतच इथे हिमालयाच्या पायथ्याशी आढळणारे अनेक वन्यजीव व पक्ष्यांची रेलचेल आहे.

**जाण्याचा उत्तम काळ :** हे अभयारण्य ऑक्टोबर ते जूनपर्यंत उघडे असते; पण इथे जाण्याचा उत्तम काळ हिवाळा (डिसेंबर ते फेब्रुवारी) व उन्हाळा (मार्च ते मे) असा आहे.

**वनस्पती :** इथले जंगल गवती मैदाने व तराई-दुआर प्रकारच्या अधिवासाचे आहे. इथे गवत, वनस्पतींच्या नानाविध प्रजातींसोबतच साल, आंबा, वड, पिंपळ, साग, धावडा, सिरस व बांबूंचाही मोठ्या प्रमाणात आढळ आहे.

**वन्य प्राणी :** इथे वाघासोबत दुर्मीळ हिस्पीड ससा, दलदलीतला बाराशिंगा, बिबळा, हिमालयातील काळे अस्वल, झिपरे अस्वल, रडी व सामान्य मुंगूस, रानडुक्कर, रानमांजर, वाघाटी, चांदी अस्वल, गोरल, चितळ, सांबर, काकर, हनुमान वानर, कोल्हा यांचेही वास्तव्य आहे.

**पक्षीजीवन :** इथे ५०० पेक्षा जास्त पक्ष्यांचा आढळ असल्याने हे पक्षी निरीक्षकांसाठी स्वर्गच आहे. इथे बंगाल तणमोर, कलीज फेजंट, लाल रानकोंबडा, मोठा धनेश, नीलगळ्याची नांचण, लिओथ्रिक्स, ब्रॉडबील, ट्वानी मासेमारू, घुबड, करड्या डोक्याचा व पलासचा गरुड, लाल छातीचा पोपट यांचा आढळ आहे.

**सरपटणारे जीव :** नाग, फुरसे, घोणस, अजगर, राजनाग, मण्यार, धामण, विरोळा, कुकरी, तस्कर, तांबड्या पाठीचा झाडसाप, रानसरडा.

**कुठे–काय बघाल :** इथे खास पाणी असलेल्या झीलच्या काठावर जास्ती वन्य प्राणी आणि पक्षी दिसण्याची शक्यता असते.

**आसपासची बघण्यायोग्य स्थळं :** पिलीभित या शहरात फिरून तुम्हाला अनेक पर्यटक आकर्षणांचा आनंद लुटता येईल.

**कसे जाल :**

**जवळचे विमानतळ :** लखनौ (२५० कि.मी.) हे जवळचे विमानतळ आहे.


**जवळचे रेल्वे स्टेशन :** पिलीभित, विलासपूर व पुरणपूर ही जवळची स्टेशनं आहेत.

**जवळचे बस स्थानक :** पिलीभितला जाण्यासाठी नैनिताल व बरेलीवरून सतत बसेस सुरू असतात. तसेच इथे या दोन्ही शहरांखेरीज लखनौवरूनदेखील खासगी गाड्यांनी पोहोचता येते.

**कुठे राहाल :** पिलीभित व्याघ्र प्रकल्पात माला, बनकट्टी व चुका इथे वनविभागाचे विश्रामगृह व लॉगहट्स उपलब्ध आहेत. त्यासाठी क्षेत्र संचालक, पिलीभित व्याघ्र प्रकल्प, पिलीभितशी संपर्क साधावा.

त्याशिवाय बरेली व पिलीभित इथे विविध बजेटचे अनेक हॉटेल्स, लॉजेस व खानावळीही सहजपणे उपलब्ध आहेत.

✦



# दुधवा व्याघ्र प्रकल्प

## बिली अर्जनसिंहांच्या जंगलात चला...

**राज्य :** उत्तर प्रदेश
**जिल्हा :** लखीमपूर खेरी
**कुठे आहे :** भारत-नेपाळ सीमेवरील उत्तरी सीमेलगत.
**अंतर :** लखनौपासून २०१ कि.मी. वर

**अरण्याबद्दल थोडंसं :** भारत-नेपाळ सीमेवरील दुधवाचे जंगल तिथे लखीमपूर-खैरी गावात राहणाऱ्या प्रसिद्ध वन्यजीव संरक्षक बिली अर्जनसिंहांमुळे प्रसिद्ध झाले आहे. त्यांनी या जंगलाचे संरक्षण व संवर्धन करून त्याला पुन:उभारणीसाठी अतिशय मोलाचा हातभार लावला होता. हे जंगल १९७७ साली राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करण्यात आले. त्याला १९८८ साली 'व्याघ्र प्रकल्पा'चा दर्जा देण्यात आला. या अभयारण्याचा भूभाग ६८० चौ.कि.मी. च्या दुधवा व्याघ्र प्रकल्प आणि २०० चौ.कि.मीच्या 'किशनपूर वन्यजीव अभयारण्यात' विभागाला गेला आहे. मोहना व सुहेली या दोन नद्यांच्या मध्ये वसलेले हे अरण्य साल वृक्ष आणि विस्तीर्ण गवती मैदानांच्या अखंड रांगांमध्ये बुडून गेल्यासारखे वाटते. एके काळी एकशिंगी गेंड्याचे घर असलेल्या या अरण्यात नामशेष झाल्यावर परत १९८४ ला गेंडे सोडण्यात आले.

**कशी कराल भ्रमंती :** या अरण्यात जीपने आणि हत्तीच्या पाठीवरून भ्रमंती करून वन्यजीव निरीक्षण करता येते.

**कशासाठी जाल :** एकशिंगी गेंडा, वाघ, हिस्पीड ससा, गोरल व सुमारे ४१० पेक्षा जास्त जातींचे पक्षी व सरपटणारे जीव.

**जाण्याचा उत्तम काळ :** हे पार्क १५ नोव्हेंबर ते १५जूनपर्यंत पर्यटकांसाठी उघडे असते; पण उत्तम काळ हा फेब्रुवारी ते मे असा आहे.

**वनस्पती :** साल, साग, वड, पिंपळ, जांभूळ, धावडा, चारोळी व विविध प्रकारचे गवत व औषधी वनस्पती.